८

# व्यावसायिक व बिगर व्यावसायिक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षेचा तुलनात्मक अभ्यास

**जयश्री कृष्णकुमार जथे (वडस्कर)**
संशोधनकर्ती,
पदव्युत्तर शिक्षण विभाग,
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**डॉ. रेणू बायस्कर (सदार)**
सहाय्यक प्राध्यापक,
पदव्युत्तर शिक्षण विभाग,
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

## सारांश

पुर्वी शिक्षण म्हणजे केवळ शाळा–कॉलेजात जाणे एवढेच गृहित धरल्या जाते, परंतु शिक्षण ही एवढी संकुचित संकल्पना नसून शिक्षण ही आजन्म चालणारी प्रक्रिया आहे. आधुनिक काळात शैक्षणिक आकांक्षा ही मानवी जीवनात अतिमहत्वाची गरज ठरू पाहते आहे. एकंदरीत शिक्षणाचे महत्व पाहता विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक आकांक्षा या घटकाच्या संदर्भात सद्यस्थिती काय आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनकार्यात केला आहे. संशोधनकार्यात माहिती मिळण्यासाठी प्रमाणिकृत संशोधन पद्धतीचा वापर केला गेला व सर्वेक्षण व विश्लेषण पद्धतीचा उपयोग करण्यात आला. संशोधनाकरीता विदर्भातील विविध प्रकारच्या शैक्षणिक संस्थांमधील पदवी स्तरातील विद्यार्थ्यांची नमुना पद्धतीने निवड करून अभ्यास करण्यात आला. या संशोधनाकरीता विविध महाविद्यालयांची यादृच्छिक न्यादर्श पद्धतीने निवड करण्यात आली व व्यावसायिक व बिगर व्यावसायिक महाविद्यालयातील एकुण १२०० विद्यार्थ्यांची न्यादर्श म्हणून निवड करण्यात आले. प्राप्त परिणामांच्या सांख्यिाकिय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनाास आले की बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांपेक्षा व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तर अधिक आहे.

## १.० प्रस्तावना

शिक्षणाचा सर्वसाधारण अर्थ, 'चार भिंती आड घेतले जाणारे ज्ञान म्हणजे शिक्षण होय'. असाच याचा अर्थ काढल्या जातो. त्यामुळे शिक्षण म्हणजे, केवळ शाळा–कॉलेजात जाणे एवढेच गृहित धरल्या जाते. मात्र शिक्षण ही एवढी संकुचित संकल्पना नसून शिक्षण ही आजन्म चालणारी प्रक्रिया आहे (कुंडले, १९९०). मनुष्य हा जन्मापासून तर मृत्यूपर्यंत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष शिक्षण घेत असतो. शिकण्याची प्रक्रिया केवळ मानवी जीवनात आढळते असे नाही, तर मानवेत्तर प्राणीही शिकतात. परंतू मानवी जीवनात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. शिक्षणाच्या बळावरच मानवाने समाज निर्माण केला. तर बुद्धीच्या सामर्थ्यावर वैज्ञानिक शोध लावून उन्नती करून घेतली आहे. या ज्ञानदीपाच्या प्रकाशातच मनुष्य प्रगतीची वाटचाल करीत आहे. शिक्षण ही नैसर्गिक प्रक्रिया असली तरी मानवाला निसर्गप्राप्त शिक्षणावर विसंबून राहता येणार नाही (जाधव व भोसले, २००३). अनेक गोष्टी



Vol: 7th , Issue : I , English-Marathi, Quarterly: 1st June 2018,ISSN : 2319-5525
UGC Approval No. 63299

त्याला प्रयत्नपूर्वक शिकाव्याच लागतात. कौटुंबिक व सामाजिक जीवनातील अनुभवातून आपणास हे शिक्षण पुरेशा प्रमाणात मिळू शकत नसल्यामुळे शिक्षणसंस्था निर्माण केल्या गेल्या आहेत.

आजच्या युगात शिक्षणाद्वारे उच्च पदाची नौकरी वा व्यावसाय मिळावा हीच अनेक्षा अनेक कुटुंबातील व्यक्तिची दिसून येते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने जास्तीत जास्त टक्केवारी घेवून शिक्षण पूर्ण करावे ही अपेक्षा समाजाकडून किंबहूना शिक्षकांकडूनही केली जाते (Khattab, 2015). त्यामुळेच शालेय संपादन हे महत्वाचे ठरते. तर, शैक्षणिक आकांक्षा ही संकल्पना व्यक्तिपरत्वे बदलत असल्याचे दिसून येते. आधुनिक काळात शैक्षणिक आकांक्षा ही मानवी जीवनात अतिमहत्वाची गरज ठरू पाहते आहे (Marjoribanks, 2005). व्यक्तिला जीवनावश्यक असणाऱ्या गरजांची पूर्तता झाल्यानंतर त्याचे ध्येय हे व्यावसायिक, सामाजिक, आर्थिक वा राजकीय प्रतिष्ठा व स्थान प्राप्त करणे हे असते. आणि हे स्थान प्राप्त करण्याकरिता तो जे प्रयत्न करतो, त्या प्रयत्नामध्ये कमी अधिक प्रमाणात यशा–अपयशांचा स्विकार करतो व आपल्या महत्वकांक्षेला साकार करण्याचा प्रयत्न करतो (Kaur 2012). या सर्व प्रक्रियेतील विविध स्तरांना शैक्षणिक आकांक्षा म्हणता येईल.

अंधारातून प्रकाशाकडे जाण्याची कल्पना शिक्षणात आहे. मानवामधील पशुत्व कमी करण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे. भारतीय समाजरचनेमुळे आजही बऱ्याच मोठया प्रमाणात मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. या कारणामुळे पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये समाज, कुटुंब आणि सामाजिक संस्था याच्याकडे विद्यार्थ्यांचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हावा याकरिता अभ्यासक्रमाची रचना केली आहे. या शिक्षणातून शैक्षणिक संपादन व शैक्षणिक आकांक्षा या घटकांच्या संदर्भात सद्यस्थिती काय आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनकार्यात केला आहे.

## २.० संशोधनाची पद्धती व कार्यवाही

संशोधन कार्यासाठी निर्दोष माहिती मिळण्यासाठी व संशोधनाची उद्देशपुर्ती होण्यासाठी प्रमाणिकृत संशोधन पद्धतीचा वापर केला गेला. संशोधनाची उद्दिष्टे अभ्यासुन त्यानुसार संशोधन करण्याकरिता सर्वेक्षण व विश्लेषण पद्धतीचा उपयोग करण्यात आला. प्रस्तुत संशोधन अध्ययनामध्ये सर्वेक्षण (Survey Method) पद्धतीचा उपयोग करण्यात आला (घाटोळे, १९९०) (बोधनकर व अलोनी, २००३).

**२.१ संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :**

संशोधनाकरीता विदर्भातील विविध प्रकारच्या शैक्षणिक संस्थांमधील पदवी स्तरातील विद्यार्थ्यांची नमुना पद्धतीने निवड करून अभ्यास करण्यात आला (जरारे, २००४). शैक्षणिक संस्था निवडतांना संस्थांचे प्रकार विचारात घेण्यात आले. या अध्ययनासाठी कार्यक्षेत्र म्हणुन विदर्भातील कला, वाणिज्य, विज्ञान व अभियांत्रिकी, विधी व वैद्यकिय शैक्षणिक संस्थंची निवड करण्यात आली.

**२.२ संशोधनाची उद्दिष्टे**

- पदवी स्तरावरील व्यावसायिक विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षेचा शोध घेणे.
- पदवी स्तरावरील बिगर व्यावसायिक विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षाचा अभ्यास करणे.
- पदवी स्तरावरील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराची तुलना करणे.

**२.३ संशोधनाची परिकल्पना**

- पदवी स्तरावरील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा स्तरामध्ये सार्थक फरक दिसून येतो.

**२.४ संशोधनाचे कार्यक्षेत्र**

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी संशोधन क्षेत्र म्हणुन अध्ययनकर्तीने महाराष्ट्राच्या विदर्भ विभागातील नागपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती जिल्हयांची निवड केली. **२.५ जनसंख्या व नमुना निवड**

प्रस्तूत संशोधनकार्यात विदर्भातील सर्व पदवी स्तराअंगर्तत येणाऱ्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक महाविद्यालयातील म्हणजेच कला, वाणिज्य, विज्ञान या बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम आणि अभियांत्रिकी, वैद्यकिय व विधी या व्यावसायिक अभ्यासक्रमातील सर्व महाविद्यालय व त्यातील सर्व पदवी व अंतिम वर्षाचे विद्यार्थी म्हणजे प्रस्तूत संशोधनाची जनसंख्या होय. या संशोधनाकरीता विविध महाविद्यालयांची यादृच्छिक (लॉटरी) न्यादर्श पद्धतीने (कऱ्हाडे, २००८, महाले व कर्डिले, २००२) निवड करण्यात आली व या महाविद्यालयातुन स्तरीय यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या अंतिम वर्षाच्या प्रत्येक शाखेतील १०० मुले व १०० मुली असे एकूण २०० विद्यार्थी याप्रमाणे व्यावसायिक महाविद्यालयातील ६०० विद्यार्थी व बिगर व्यावसायिक महाविद्यालयातील प्रत्येक शाखेतील १०० मुले व १०० मुली असे एकूण २०० विद्यार्थी याप्रमाणे बिगर व्यावसायिक महाविद्यालयातील ६०० विद्यार्थी असे एकुण १२०० विद्यार्थ्यांची न्यादर्श म्हणून निवड करण्यात

**२.६ संशोधन आराखडा**

प्रस्तुत संशोधनात निर्माण झालेल्या निष्कर्षाची संशोधन उद्‌देशाच्या दृष्टीने संबद्धता व संशोधन कार्यात मितव्ययता याची सांगड घालण्यात आली आहे (कायंदे पाटील, २००६). अर्थातच तथ्यांचे योग्य संकलन व विश्लेषण यासाठी आवश्यक अटीची पूर्तता करून वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अशा मिश्र संशोधन आराखडयाची निवड करण्यात आली.

**२.७ तथ्य संकलनाकरीता संशोधनाची साधने :**

प्रस्तुत अध्ययनात माहिती संकलित करण्याकरिता प्रमाणीकृत पद्धतीचा व प्रश्नावलीचा उपयोग करण्यात आला. प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनाकरिता खालील साधनाचा वापर करण्यात आला.

**२.८ शैक्षणिक आकांक्षा (Educational Aspiration Scale (EAS) –**

कुठल्याही मनुष्याची आकांक्षा त्याची मानसिक स्थिती व प्रेरणा दर्शविते. विविध स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा या संबंधि अध्ययन करण्याकरिता या मापनीची निर्मिती करण्यात आली आहे. डॉ. व्हि.पी. शर्मा व डॉ. अनुराधा गुप्ता याची 'Educatinal Aspiration Scale (EAS)' या प्रमाणित चाचणीत एकुण २८ प्रश्न असून कोणते प्रत्येकी ४ पर्याय कोणते दिलेले आहेत. या प्रमाणित चाचणीची विश्वसनियता ०.७९ असून वैधता ही ०.७५ आहे.

**२.९ तथ्य संकलन**

संशोधनकर्तीने प्रस्तुत अध्ययनात तथ्ये वा प्रतिक्रिया यांना विविध वर्गात वा श्रेणीत संघटीत केल्या गेले व प्रत्येक पदाचा त्याच्या सोयीप्रमाणे अंक व चिन्ह दिले. सारणीद्वारे संशोधिकेला विविध तथ्यांची सुलभतेने तुलना करता आली. तसेच सारणीवरून तथ्यांचा अर्थ आणि त्याचे महत्व लक्षात आले.

**२.१० माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण :**

सांख्यकीय तंत्रातील विविध ग्राह्यता चाचणीचा विशेषत्वाने उपयोग करण्यात आला. त्या आधारावर निष्कर्ष काढले गेलेत. प्राप्त माहितीवरुन वारंवारीता (Frequency) व बहुलक (Mode) काढण्यात आले. अभ्यासातील विविध घटक, पडताळण्याकरिता देण्यात आलेले गृहित प्रमेय आणि वापरण्यात आलेला संशोधनाचा आराखडा लक्षात घेता योग्य सांख्यकीय परीक्षणाचा वापर केला.

३.० माहितीचे विश्लेषण व सांख्यिकीय स्पष्टीकरण

३.१ विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तर

सारणी क्र. १: पदवी स्तरावरील बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तर – मुले

| शैक्षणिक आकांक्षा स्तर | बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम | | व्यावसायिक अभ्यासक्रम | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निम्न | १९ | ६.३ | ६४ | २१.३ |
| मध्यम | २६८ | ८९.३ | २३६ | ७८.७ |
| उच्च | १३ | ४.३ | — | — |
| **एकूण** | **३००** | **१००.०** | **३००** | **१००.०** |

**काई–वर्गमूल्य:** ३९.४२९; **स्वातंत्र्यांश:** २; **P मूल्य**= <0.05; **तालिका मूल्य**:५.९९

वरिल सारणी क्र. १ मध्ये अध्ययन क्षेत्रातील पदवी स्तरावरील बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातील ६.३ टक्के व व्यावसायिक अभ्यासक्रमातील २१.३ टक्के विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तर निम्न असून बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातील ८९.३ टक्के व व्यावसायिक अभ्यासक्रमातील ७८.७ टक्के विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तर मध्यम असल्याचे आढळले. तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातील केवळ ४.३ टक्के विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तर उच्च असल्याचे निदर्शनास आले.

### ३.२ विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तर

सारणी क्र. २: पदवी स्तरावरील बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तर – मुली

| शैक्षणिक आकांक्षा स्तर | बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम | | व्यावसायिक अभ्यासक्रम | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निम्न | १६ | ५.३ | १०४ | ३४.७ |
| मध्यम | २८० | ९३.३ | १८७ | ६२.३ |
| उच्च | ४ | १.३ | ९ | ३.० |
| **एकूण** | **३००** | **१००.०** | **३००** | **१००.०** |

**काई–वर्गमूल्य:** ८४.९७७; **स्वातंत्र्यांश:** २; **P मूल्य**= <0.05; **तालिका मूल्य**: ५.९९

वरिल सारणी क्र. २ मध्ये अध्ययन क्षेत्रातील पदवी स्तरावरील बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थीनींच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातील ५.३ टक्के व व्यावसायिक अभ्यासक्रमातील ३४.७ टक्के विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तर निम्न असून बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातील ९३.३ टक्के व

व्यावसायिक अभ्यासक्रमातील ६२.३ टक्के विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तर मध्यम असल्याचे आढळले. तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातील केवळ १.३ टक्के व व्यावसायिक अभ्यासक्रमातील केवळ ३ टक्के विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तर उच्च असल्याचे निदर्शनास आले.

### ३.३ विद्यार्थी व विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तर

सारणी क्र. ३: पदवी स्तरावरील बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थी व विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तर

| | विद्यार्थी | | | | विद्यार्थीनी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम | | व्यावसायिक अभ्यासक्रम | | बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम | | व्यावसायिक अभ्यासक्रम | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्क | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| निम्न | १९ | ६.३ | ६४ | २१.३ | १६ | ५.३ | १०४ | ३४.७ |
| मध्यम | २६८ | ८९.३ | २३६ | ७८.७ | २८० | ९३.३ | १८७ | ६२.३ |
| उच्च | १३ | ४.३ | — | — | ४ | १.३ | ९ | ३.० |
| **एकूण** | **३००** | **१००.०** | **३००** | **१००.०** | **३००** | **१००.०** | **३००** | **१००.०** |
| | काई–वर्गमूल्य: ३९.४२९; स्वातंत्र्यांश: २; P मूल्य= <0.05; तालिका मूल्य: ५.९९ | | | | काई–वर्गमूल्य: ८४.९७७; स्वातंत्र्यांश: २; P मूल्य= <0.05; तालिका मूल्य:५.९९ | | | |

वरिल सारणी क्र. ३ मध्ये अध्ययन क्षेत्रातील पदवी स्तरावरील बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराची माहिती दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातील ६.३ टक्के विद्यार्थी व ५.३ टक्के विद्यार्थीनी आणि व्यावसायिक अभ्यासक्रमातील २१.३ टक्के विद्यार्थी व ३४.७ टक्के विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तर निम्न असून बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातील ८९.३ टक्के विद्यार्थी व ९३.३ टक्के विद्यार्थीनी आणि व्यावसायिक अभ्यासक्रमातील ७८.७ टक्के विद्यार्थी व ६२.३ टक्के विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तर मध्यम असल्याचे आढळले. तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातील ४.३ टक्के विद्यार्थी व १.३ टक्के विद्यार्थीनी आणि व्यावसायिक अभ्यासक्रमातील ३ टक्के विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तर उच्च असल्याचे निदर्शनास आले.

### ३.४ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराची तुलना

सारणी क्र. ४: पदवी स्तरावरील बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराची तुलना

| विद्यार्थी | संख्या | मध्यमान | मा.वि. | किमान | कमाल | Z | P |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम | ३०० | ३८.६ | ±९.५ | १५ | ६४ | २.३४८ | <०.०५ |
| व्यावसायिक अभ्यासक्रम | ३०० | ३३.३ | ±८.१ | १८ | ५० | | |

प्रस्तुत सारणीत पदवी स्तरावरील बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराची तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तराचा सरासरी गुणांक ३८.६±९.५ असून व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तराचा सरासरी गुणांक ३३.३±८.१ असल्याचे आढळले. वरील माहितीवरून बिगर व्यवसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराची तुलना केली असता बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तर व्यवसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक असल्याचे आढळले.

### ३.५ विद्यार्थीनींच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराची तुलना

सारणी क्र. ५: पदवी स्तरावरील बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थीनींच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराची तुलना

| विद्यार्थीनी | संख्या | मध्यमान | मा. वि. | किमान | कमाल | Z | P |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम | ३०० | ३६.६ | ±७.७ | २१ | ५८ | २.०९४ | <०.०५ |
| व्यावसायिक अभ्यासक्रम | ३०० | ३१.८ | ±१०.७ | १९ | ५५ | | |

प्रस्तुत सारणीत पदवी स्तरावरील बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थीनींच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराची तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तराचा सरासरी गुणांक ३६.६±७.७ असून व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तराचा सरासरी गुणांक ३१.८±१०.७ असल्याचे आढळले. वरील माहितीवरून बिगर व्यवसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थीनींच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराची तुलना केली असता बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तर व्यवसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थीनींपेक्षा अधिक असल्याचे आढळले.

## ४.० निष्कर्ष

### ४.१ विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तर

प्राप्त परिणामांच्या सांख्यिाकिय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, बिगर व्यावसायिक व व्यावसायिक या दोन्ही अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तर मध्यम स्वरूपाचा आहे.

## ४.२ विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तर

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकिय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात आला की, बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तर मध्यम स्वरूपाचा आहे. परंतु, व्यावसायिक अभ्यासक्रमातील बऱ्याच विद्यार्थीनींचा आकांक्षा स्तर निम्न स्वरूपाचा देखील असल्याचे आढळले.

## ४.३ विद्यार्थी व विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तर

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकिय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात आला की, बिगर व्यावसायिक व व्यावसायिक या दोन्ही अभ्यासक्रमातील विद्यार्थी व विद्यार्थीनीचा शैक्षणिक आकांक्षा स्तर मध्यम स्वरूपाचा आहे.

## ४.४ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराची तुलना

- प्राप्त परिणामांच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तर व्यवसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक आहे.

## ४.५ विद्यार्थीनींच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराची तुलना

- प्राप्त परिणामांच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थीनींचा शैक्षणिक आकांक्षा स्तर व्यवसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थीनींपेक्षा अधिक आहे.

## ५.० संशोधन परिकल्पना परिक्षण

पदवी स्तरावरील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा स्तरामध्ये सार्थक फरक दिसून येतो.

प्राप्त परिणामांच्या सांख्यिकिय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, पदवी स्तरावरील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षेमध्ये सार्थक फरक आहे यावरून, " पदवी स्तरावरील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा स्तरामध्ये सार्थक फरक दिसून येतो" या परिकल्पनेचा स्वीकार करण्यात येतो.

## ६.० संदर्भ सुची

१. कुंडले, म. बा. 'शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक मानसशास्त्र', श्री विद्या प्रकाशन, राविवार पेठ, पुणे १९९०, पृ. क्र. ६.

२. जाधव, मो., भोसले, आ. "भारतीय शिक्षणाचा विकास" पहिली आवृत्ती फडके प्रकाशन, कोल्हापूर, ऑक्टोबर, २००३ पृष्ठ क्र.१५

३. घाटोळे रा.ना. समाज शास्त्रीय संशोधन तत्वे आणि पध्दती श्री मंगेश प्रकाशन रामदासपेठ नागपूर १० चतुर्थ आवृत्ती १९९०.

४. बोधनकर सु., अलोनी वि., सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००३.

५. बोरूडे, रा. र., संशोधन पध्दतीशास्त्र, प्रकाशक—महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर, तिसरी आवृत्ती १९८७.

६. कायंदे पाटील गं. वि., संशोधन पद्धती चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक—१३, जून, २००६

७. कऱ्हाडे बी. एम — 'शास्त्रीय संशोधन पद्धती' पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर — २००८

८. महाले सं., कर्डिले व., संशोधन पद्धती, संशोधनात सांख्यिकी तंत्राचे उपयोजन, प्रकाशक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००२

९. भांडारकर पु.ल. 'सामाजिक संशोधन पद्धती 'महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी विद्या बुक्स, औरंगाबाद — १९९९

१०. जरारे वि., सामाजिक शास्त्राची संशोधन प्रणाली अद्यवैत प्रकाशन अकोला प्रथम आवृत्ती २००४.

११. नाथगोंडे गु., सामाजिक संशोधन पध्दती— फडके प्रकाशन कोल्हापूर द्वितीय आवृत्ती ऑक्टों १९९९.

१२. Kaur P. (2012). Educational Aspirations Of Adolescents In Relation To Their Level Of Intelligence, International Multidisciplinary e-Journal, I(VII), pp. 37 – 43.

१३. Khattab, N. (2015), Students' aspirations, expectations and school achievement: what really matters? Br Educ Res J, 41, pp. 731–748.

१४. Marjoribanks, K. (2005). Family background, adolescents' educational aspirations, and Australian young adults' educational attainment International Education Journal, 6(1), pp. 104-112

...